लोकमत

# १४ परीक्षांचे निकाल जाहीर

**कोल्हापूर :** एमबीए., बीबीए यासह विविध १४ अभ्यासक्रमांच्या परीक्षांचे निकाल शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाने मंगळवारी ऑनलाईन जाहीर केले.

बी. लिब (सत्र एक आणि दोन), एमबीए (सीबीसीएस सत्र एक आणि दोन), बीबीए (सत्र तीन आणि चार), एम. ए. (इंग्लिश सत्र एक आणि दोन), बी. एड., एम. एड. (सत्र सात आणि आठ), एमसीए (कॉमर्स सत्र एक आणि दोन), बी. व्होक (टुरिझम अँड सर्व्हिस इंडस्ट्रीज सत्र तीन आणि चार) या अभ्यासक्रमांच्या परीक्षांचे निकाल जाहीर झाले. एम. ए., एम. कॉम., एम. एस्सी., एमएसडब्ल्यू, एमसीए या अभ्यासक्रमांच्या परीक्षा मंगळवारी झाल्या. २०२१-२२ साठी एम. फिल., पीएचडीसाठीची प्रवेश परीक्षा दि. २६ ते २८ ऑक्टोबरदरम्यान होणार आहे. त्यासाठी शहाजी छत्रपती महाविद्यालय (कोल्हापूर), मथुबाई गरवारे कन्या महाविद्यालय (सांगली), यशवंतराव चव्हाण इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स (सातारा) येथे होईल. अद्याप, ज्या विद्यार्थ्यांची परीक्षा सुरू झालेली नाही. त्यांनी सराव चव्हाण (मॉक टेस्ट) द्यावी.

# प्रथम वर्ष, थेट द्वितीय वर्ष पदविका प्रवेश संस्थास्तरीय समुपदेशन फेरी १३ पासून सुरू

**कोल्हापूर :** शासकीय तंत्रनिकेतन संस्थेत प्रथम वर्ष व थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमाच्या सिव्हिल, मॅकेनिकल, इलेक्ट्रिकल, मेटलर्जी इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन या शाखेतील रिक्त जागा भरण्यासाठी संस्थास्तरावर समुपदेशन फेरी राबविण्यात येणार आहे. त्यानुसार प्रथम वर्षाची पहिली, दुसरी व तिसरी समुपदेशन फेरी १३, १६ व २० ऑक्टोबर रोजी होणार आहे. त्याप्रमाणे थेट द्वितीय वर्षासाठी १४, १८ व २० ऑक्टोबर या कालावधीत समुपदेशन फेरी चालणार आहे.

# विद्यापीठ स्पर्धा परीक्षा केंद्र प्रवेश परीक्षेसाठी ऑनलाईन अर्ज करण्याचे आवाहन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात पदवीप्राप्त व पदव्युत्तर शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना यूजीसीच्या योजनेंतर्गत एस.सी., एस.टी., ओबीसी, ई.डब्ल्यू.एस. (नॉनक्रिमिलेयर) व अल्पसंख्याक (मुस्लिम) ख्रिश्चन, शीख, बौद्ध आणि जैन व खुल्या गटातील विद्यार्थ्यांकरिता विद्यापीठातील स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रात २०२१-२२ शैक्षणिक वर्षासाठी प्रवेश परीक्षा अर्ज ऑनलाईन पद्धतीने मागविण्यात येत आहेत. अर्ज विद्यापीठाच्या संकेतस्थळावर (www.unishivaji.ac.in) यूजीसी सेंटर फॉर कोचिंग फॉर कॉम्पेटिटिव्ह एक्झामिनेशन्सवर आणि केंद्रांच्या कार्यालयात उपलब्ध आहेत. २० ऑक्टोबरपर्यंत प्रवेश अर्ज आवश्यक कागदपत्रांसह केंद्राच्या ई-मेलवर पाठवून द्यावेत, असे आवाहन समन्वयक प्रा. डॉ. पी. एस. कांबळे यांनी केले आहे.

# विद्यापीठ दूरशिक्षण केंद्रामार्फत चार नवे ऑनलाईन अभ्यासक्रम

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण केंद्रामार्फत यावर्षीपासून चार अभ्यासक्रम ऑनलाईन स्वरूपात सुरू करण्याच्या प्रस्तावास मंजुरी प्राप्त झाली आहे. यात एमबीए, एम.कॉम., एम.एस्सी. (गणित) व एम.एस्सी. (संगणकशास्त्र) या अभ्यासक्रमांचा समावेश आहे, अशी माहिती केंद्राचे संचालक डॉ. ए. एम. सरवदे यांनी दिली.

शिवाजी विद्यापीठास 'नॅक' (बंगळूर) यांचे 'ए++' मानांकन प्राप्त झाल्यानंतर नवी दिल्ली येथील अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद यांच्याकडून विद्यापीठाच्या दूरशिक्षण केंद्राच्या माध्यमातून ऑनलाईन अभ्यासक्रम सुरू करण्यास मान्यता मिळाली आहे. यात नियमित एमबीएबरोबरच ऑनलाईन एमबीए, एम.कॉम., एम.एस्सी. (गणित) आणि एम.एस्सी. (संगणकशास्त्र) या अभ्यासक्रमांचा समावेश आहे. यामुळे केवळ राज्य, देश नव्हे तर विदेशातील विद्यार्थ्यांनाही शिवाजी विद्यापीठात ऑनलाईन शिक्षण घेण्याची संधी प्राप्त होणार आहे.

हे अभ्यासक्रम सध्याच्या बदलत्या काळानुसार विद्यार्थ्यांना रोजगारक्षम बनवण्यास उपयुक्त असल्याने त्यांना विद्यार्थ्यांचा उत्साही प्रतिसाद लाभेल, असे डॉ. सरवदे यांनी सांगितले.

# एम.फिल, पीएच.डी. प्रवेश परीक्षा २६ ऑक्टोबरपासून

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातर्फे शैक्षणिक वर्ष २०२१-२२ या वर्षासाठी एम.फिल, पीएच.डी. प्रवेश परीक्षेचे २६ ते २८ ऑक्टोबर या कालावधीत आयोजन करण्यात आले आहे. श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय (कोल्हापूर), श्रीमती मथुबाई गरवारे कन्या महाविद्यालय (सांगली) व सातारा येथील यशवंतराव चव्हाण इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स महाविद्यालयात या परीक्षा होणार आहेत. परीक्षेचे वेळापत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर ठेवण्यात आले आहे. वेळापत्रक पाहून विद्यार्थ्यांनी परीक्षेचे नियोजन करावे, असे आवाहन परीक्षा विभागातर्फे करण्यात आले आहे.

# विद्यापीठाच्या शिव-वार्ता वाहिनीवर डॉ. आर.व्ही. गुरव यांची उद्या मुलाखत

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या शिव-वार्ता वाहिनीवर गुरुवार (दि. १४) रोजी सकाळी ११ वाजता विद्यार्थी कल्याण संचालक डॉ. आर. व्ही. गुरव यांची मुलाखत प्रसारित केली जाणार आहे. विद्यापीठाच्या विद्यार्थी, पालक, शिक्षक व प्रशासकीय कर्मचारी कल्याण निधी योजनेने यावर्षी सर्व संबंधित घटकांना विक्रमी मदत केली आहे. सहा महिन्यांच्या काळात विद्यापीठाने एक कोटीहून अधिक निधीचे वितरण केले आहे. या संदर्भात संचालक डॉ. गुरव माहिती देणार आहेत. शिव-वार्ता वाहिनीच्या लिंकवर ही मुलाखत प्रसारित करण्यात केली जाणार असून याचा लाभ घ्यावा, असे विद्यापीठाने कळवले आहे.

# एम.ए., एम.कॉम., एमसीएच्या परीक्षा सुरळीत

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या वतीने पदव्युत्तर अभ्यासक्रम प्रथम वर्षाच्या परीक्षा सुरू आहेत. मंगळवारी एम.ए., एम.कॉम., एम.एस्सी., एम.एस.डब्ल्यू., एमसीए अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षाच्या परीक्षेला २० विद्यार्थी परीक्षेला उपस्थित होते. विद्यापीठाच्या वतीने ४८४ अभ्यासक्रमांच्या परीक्षांचे निकाल आजपर्यंत घोषित झाले आहेत. एमबीए, बीबीए, बी.लिब, एम.ए.(इंग्रजी), बी.एड., एम.एड., एमसीए, बी.व्होक अभ्यासक्रमांचा यात समावेश आहे, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक जी.आर.पळसे यांनी दिली.

# विद्यापीठाच्या नियोजित सातारा उपकेंद्रासाठी सर्वतोपरी सहकार्य

## खा. उदयनराजे; शिवाजी विद्यापीठात बैठक

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या सातारा येथील नियोजित उपकेंद्रासाठी सर्वतोपरी सहकार्य करण्यात येईल, अशी ग्वाही खा. उदयनराजे भोसले यांनी दिली. मंगळवारी सातारा जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेऊन उपकेंद्राच्या जागेसाठीचा प्रश्न मार्गी लावण्याचा प्रयत्न राहील, असेही त्यांनी सांगितले.

शिवाजी विद्यापीठात खा. भोसले यांच्या प्रमुख उपस्थितीत व कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या अध्यक्षतेखाली विशेष बैठक झाली. यावेळी ते बोलत होते.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, शिवाजी विद्यापीठाची उपकेंद्रे अगर उपपरिसर निर्माण करीत असताना स्थानिक संसाधने, भौगोलिक वैशिष्ट्ये या सर्वांचा समावेश करून त्यांची नव्या शैक्षणिक धोरणाशी सांगड घालून विद्यार्थ्यांना स्थानिक वैशिष्ट्यांची रोजगाराभिमुखता प्रदान करून संपन्न व समृद्ध बनविणारे अभ्यासक्रम अपेक्षित आहेत.

याप्रसंगी खा. भोसले यांचा कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. व्यवस्थापन परिषद सदस्य अमित कुलकर्णी यांनी सातारा येथे उपकेंद्र स्थापन करण्याच्या दृष्टीने सुरू प्रयत्नांची माहिती दिली. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी प्रास्ताविक केले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी आभार मानले. यावेळी अधिसभा सदस्य डी. जी. बनकर, वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, उपकुलसचिव वैभव ढेरे उपस्थित होते.

पुण्य नगरी

# दूरशिक्षण केंद्रातर्फे चार नवे अभ्यासक्रम

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण केंद्रामार्फत या वर्षापासून चार अभ्यासक्रम ऑनलाईन स्वरूपात सुरू करण्याच्या प्रस्तावास मंजुरी प्राप्त झाली आहे. याबाबतची माहिती केंद्राचे संचालक डॉ. ए. एम. सरवदे यांनी दिली. एमबीए, एमकॉम, एमएस्सी (गणित) आणि एमएस्सी (संगणकशास्त्र) असे चार अभ्यासक्रम आहेत. हे अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्यासह विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे मोठे सहकार्य लाभल्याचेही त्यांनी सांगितले.

# सर्वांच्या समन्वयातून कौशल्य विकास केंद्र उभारूया

## प्रा. डॉ. डी. टी. शिर्के : सीमाभागातील महाविद्यालयांची संयुक्त बैठक

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठातर्फे सीमाभागातील विद्यार्थ्यांसाठी सुरू होत असलेल्या कौशल्य व उद्योजकता विकास केंद्राच्या गुणवत्तापूर्ण यशस्वितेसाठी या भागातील महाविद्यालयांनी पुढाकार घ्यावा. त्यामुळे या भागातील विद्यार्थी कौशल्याधिष्ठित होऊन रोजगारक्षम बनेल. यातून या भागाच्या विकासास मदत होईल. या सामूहिक कार्यात महाविद्यालय व विद्यापीठ यांनी समन्वयाने गुणवत्तापूर्ण कौशल्य, उद्योजकता विकास केंद्र उभारूया, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.



शिवाजी विद्यापीठातर्फे सीमाभागातील विद्यार्थ्यांसाठी सुरू होत असलेल्या कौशल्य, उद्योजकता विकास केंद्राच्या प्रवेश प्रक्रियेसंदर्भात र. भा. माडखोलकर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय चंदगड येथे सीमाभागातील महाविद्यालयांचे प्राचार्य, अग्रणी महाविद्यालय योजनेचे समन्वयक व कौशल्य व उद्योजकता विकास केंद्राचे समन्वयक यांच्या संयुक्त बैठकीत ते बोलत होते.

डॉ. शिर्के म्हणाले, स्पर्धात्मक जीवनामध्ये कौशल्य विकासाला महत्त्व प्राप्त झाले आहे. या भागातील विद्यार्थी कौशल्य प्रशिक्षणाने स्वयंपूर्ण व्हावा, यासाठी विद्यापीठ प्रयत्नशील आहे.

कुलसचिव विलास नांदवडेकर म्हणाले, विद्यापीठाच्या या उपक्रमाला सर्व महाविद्यालयांनी सहकार्य करावे. सामूहिक जबाबदारी म्हणून आपण सर्वांनी या भागाच्या विकासासाठी मदत करून या उपक्रमाची माहिती सर्वांपर्यंत पोहोचविण्याचे काम करूया. विद्यापीठाने या भागाच्या विकासासाठी संधी उपलब्ध करून दिली आहे. याचा लाभ घेण्यासाठी सर्वांना उद्युक्त करणे गरजेचे आहे.

डॉ. ए. एम. गुरव यांनी सादरीकरण करून या उपक्रमाविषयी उपस्थितांना मार्गदर्शन केले. शिवराज कॉलेजचे प्राचार्य डॉ. कदम म्हणाले, या विभागाच्या गुणवत्तापूर्ण विकासासाठी विद्यापीठाने सुरू केलेल्या कौशल्य प्रशिक्षण केंद्रासाठी या भागातील सर्व महाविद्यालये सहकार्य करतील.

नेसरी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भोंवर म्हणाले, कला व वाणिज्य महाविद्यालयात इनोव्हेशन सेंटर सुरू होण्यासाठी विद्यापीठाने मार्गदर्शन करून केंद्र सुरू करण्यासाठी सहकार्य करावे.

साधना महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. अनिता पोवार यांनी बचत गटांसाठी विशेष प्रशिक्षण सुरू करण्याची मागणी केली. स्वागत र. भा. माडखोलकर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी. आर. पाटील यांनी स्वागत केले. महेश चव्हाण यांनी आभार मानले. आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे अतुल ऐतवडेकर, आर. एम. जाधव उपस्थित होते.

13 OCT 2021

तरूण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठ सुरू करण्यासंदर्भात दोन दिवसात सूचना

## उच्च व तंत्र शिक्षण मंत्री उदय सामंत यांच्या कुलगुरूंच्या बैठकीत विद्यापीठांना सूचना

प्रतिनिधी
कोल्हापूर

कोरोनाचा प्रादुर्भाव कमी होत असताना शाळा सुरू झाल्या, परंतू विद्यापीठ अंतर्गत महाविद्यालये व अधिविभाग अद्याप बंद आहेत. त्यामुळे मंगळवारी उच्च व तंत्र शिक्षण मंत्री उदय सामंत यांनी राज्यतील सर्वच विद्यापीठांच्या कुलगुरूंची ऑनलाईन बैठक घेतली. या बैठकीत महाविद्यालये सुरू करण्यासंदर्भात येत्या दोन दिवसात मार्गदर्शक सूचना काढल्या जातील. तसेच जिल्ह्यातील परिस्थितीचा अभ्यास करून स्थानिक जिल्हा प्रशासनाशी चर्चा करून विद्यापीठांनी महाविद्यालये सुरू करण्यासंदर्भात निर्णय घ्यावा, अशा सूचना उच्च



शिक्षण मंत्री सामंत यांनी दिल्या.

विद्यापीठ अंतर्गत महाविद्यालये, अधिविभाग सुरू करण्यासंदर्भात राज्यातील सर्वच विद्यापीठ परिसरातील कोरोना स्थितीचा उच्च व तंत्र शिक्षण मंत्री उदय सामंत यांनी कुलगुरूंच्या बैठकीत आढावा घेतला. अधिविभाग व महाविद्यालये कशा पध्दतीने सुरू करायची यासंदर्भात मार्गदर्शक सूचना



जाहीर होतील. विद्यापीठांना सूचना प्राप्त झाल्यानंतर सूचनांचे पालन करीत येत्या आठ ते दहा दिवसात महाविद्यालये व विद्यापीठातील अधिविभाग सुरू केले जाणार आहेत.

ज्या जिल्ह्यामध्ये कोरोनाची साथ नियंत्रणात आली आहे, त्या जिल्ह्यातील महाविद्यालये, अधिविभाग सुरू करण्याचा निर्णय स्थानिक पातळीवर घेण्यास विद्यापीठांना मुभा देण्यात आली आहे. त्यामुळे कोल्हापूर जिल्ह्यातील महाविद्यालये सुरू करण्यासंदर्भात शिवाजी विद्यापीठ कधी निर्णय घेणार, याकडे शिक्षण वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

**कोल्हापूर जिल्ह्यातील महाविद्यालये कधी सुरू होणार**

कोल्हापूर जिल्ह्यात कोरोनाची साथ नियंत्रणात आल्याने जिल्ह्यातील शाळा व कनिष्ठ महाविद्यालये सुरू करण्यात आली आहेत. त्यामुळे वरिष्ठ महाविद्यालये कधी सुरू होणार याकडे विद्यार्थ्यांचे लक्ष लागले आहे. ऑनलाईन शिक्षण मिळत असले तरी अनेक तांत्रिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे शाळांप्रमाणे ऑफलाईन शिक्षण कधी मिळणार, याकडे विद्यार्थी, संशोधक विद्यार्थ्यांचे लक्ष लागले आहे.

तरुण भारत

# विद्यार्थी भवन सुवर्ण महोत्सव स्मरणिका काढण्यास मान्यता



■ डॉ. आप्पासाहेब पवार विद्यार्थी भवनच्या माजी विद्यार्थ्यांच्या बैठकीत निर्णय

■ डॉ. आप्पासाहेब पवार यांच्या पुतळ्यासंदर्भात पुढील आठवड्यात निर्णय

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील डॉ. आप्पासाहेब पवार विद्यार्थी भवन वसतिगृहाच्या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त स्मरणिका काढण्यास मान्यता मिळाली आहे. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्याबरोबर झालेल्या माजी विद्यार्थ्यांच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.

शिवाजी विद्यापीठातील डॉ. आप्पासाहेब पवार विद्यार्थी भवनच्या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये विद्यापीठातील माजी कुलगुरू, माजी अधिकारी, विद्यार्थी यांचे लेख मागवून स्मरणिका प्रकाशित करण्यात येणार आहे. शिवाजी विद्यापीठाच्या वर्धापनदिनी १८ नोव्हेंबर रोजी या स्मरणिकेचे प्रकाशन करण्यात येणार आहे. तसेच शिवाजी विद्यापीठाचे पहिले कुलगुरू यांचा पुर्णाकृती पुतळा उभारण्याची मागणी गेल्या दहा वर्षापासून करण्यात येत आहे. यासंदर्भात प्रबोधिनीच्या पदाधिकाऱ्यांनी डॉ.शिर्के यांची सोमवारी भेट घेवून चर्चा केली. परंतू पुढील आठवड्यात बैठक घेवून निर्णय घेण्याचे ठरले आहे. यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर व पदाधिकारी उपस्थित होते.